# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२२

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक २४ ऑगस्ट, २०२२ / भाद्रपद २, १९४४ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **उप मुख्यमंत्री** | |
| **(३)** | **आदिवासी विकास मंत्री** | |
| **(४)** | **खनिकर्म मंत्री** | |
| **(५)** | **उद्योग मंत्री** | |
| **(६)** | **मराठी भाषा मंत्री** | |
| **(७)** | **सहकार, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३०**

---

### चिपळूण (जि.रत्नागिरी ) वाशिष्ठी नदीला आलेल्या महापूरामध्ये नुकसान झालेल्या नुकसानग्रस्तांना भरपाई देण्याबाबत

**(१)** * ४४८९० **श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) येथे माहे जुलै, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान वाशिष्ठी नदीला आलेल्या महापुरामुळे दोन हजार कोटींचे नुकसान होवूनही अद्यापही शासनामार्फत उपाययोजना न केल्यामुळे यावर्षी देखील तेथे गंभीर पुरपरिस्थिती निर्माण झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोळकेवाडी धरणातील पाण्याच्या विसर्गाबाबत सत्यता तपासण्यासाठी तत्कालीन उपमुख्यमंत्री यांनी दिनांक १५ डिसेंबर २०२१ रोजी वा त्यासुमारास अभ्यासगट स्थापन करण्याची सूचना करुनही तब्बल पाच महिन्यांनी उक्त गटाची पहिली बैठक दिनांक २६ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास झाल्यामुळे सदरहू समितीचा अहवाल या वर्षीचा पावसाळा संपल्यानंतरच प्राप्त होईल अशी शक्यता असल्याने यावरूनच महापूराबाबत शासन गंभीर नसल्याची खंत नागरिकांकडून व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाशिष्ठी नदीपात्रांची खोली वाढविणे तसेच गाळ उपसा करणे इत्यादी कामांचे नियोजन झाले नसून पुरेशी आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा उभी करण्यातही अपयश आले असून पाऊस मोजणी तसेच नदी पात्रातील पाण्याची मोजणी करणारी अपुरी उपकरणे असणे आणि प्रशासकीय यंत्रणांतील संवादासाठी आवश्यक सॅटेलाईट फोनची प्रतिक्षा यासह पूररेषेबाबतही अद्याप उपाययोजना झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) नाही, जुलै, २०२१ मध्ये अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या पूर परिस्थिती हाताळण्यासाठी रत्नागिरी जिल्ह्याला कचरा व ढिगारे उचलणे, मदत छावण्या, शेतीपिके व मालमत्तेच्या नुकसानीसाठी राज्य प्रतिसाद निधीच्या दराने व वाढीव दराने रु.५१८०.२६ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(२) मा. मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखाली दि.३ ऑगस्ट, २०२१ रोजी पार पडलेल्या मंत्रिमंडळ समितीच्या बैठकीतील सुचना तसेच दि.१५.१२.२०२१ रोजी मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे बैठकीमध्ये दिलेल्या

निर्देशाप्रमाणे टप्पा १ मधील वाशिष्ठी नदीतील गाळ व बेटे काढण्याचे काम दि.१६.१२.२०२१ पासून सुरु करण्यात आले असून दि.१९.६.२०२२ पर्यंत वाशिष्ठी व शिवनदीतून एकूण ८.१० लक्ष घ.मी. गाळ काढण्यात आला आहे. तसेच वाशिष्ठी नदीतील गाळ व बेटे काढण्याच्या रु.१०,२८,५६,४११/- एवढ्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता शासन निर्णय जलसंपदा विभाग क्र.प्रशामा-२०२१/ (प्र.क्र.४८७/२०२१) /सिं.व्य. (महसूल), दि.७.३.२०२२ अन्वये प्राप्त झालेली आहे.

जलविज्ञान प्रकल्प नाशिक मार्फत RTDAS System चे काम मे, २०२२ अखेर करण्यात आले आहे. त्या अन्वये रत्नागिरी जिल्ह्यात ३ Automated Water Level Recorder (A.W.L.R.) व ९ ठिकाणी Automated Raingauge Station (A.R.S.) बसविण्यात आले आहेत.

तसेच रत्नागिरी जिल्ह्यामध्ये उर्वरित ८ ठिकाणी A.R.S. व ८ River gauge System साठी अंदाजपत्रक शासनास मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहे. तसेच रत्नागिरी जिल्ह्याकरीता ६ सॅटेलाईट फोन देण्यात आले आहेत.

(३) चिपळूण शहरातील पुरावर कोळकेवाडी धरणातील पाणी सोडण्याचे नियोजन करण्यासंदर्भात उपाययोजना सुचवण्याकरिता मा.श्री. दिपक मोडक, (सेवा निवृत्त), मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग यांचे अध्यक्षतेखाली अभ्यास गटाची स्स्थापना शासन निर्णय क्र.बैठक-२०२१/प्र.क्र.४७५/ २०२१/ सिं.व्य.(म), दि.२० मे, २०२२ अन्वये करण्यात आली असून सदर अभ्यासगटाच्या दि.२६.५.२०२२ व दि.२२.६.२०२२ रोजी बैठका पार पडल्या आहेत. व याबाबत Hydraulic Calculation, पडताळणी, अवजल चाचण्या घेणे व इतर कार्यवाही प्रगतीत आहे. अभ्यासगटाचा सविस्तर अहवाल व शिफारसी शासनाला दि.३१.८.२०२२ अखेर सादर करण्यात येणार आहेत.

(४) कार्यवाहीची उपाययोजना चालू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे सकनेवाडी शिवारात (ता.जि.उस्मानाबाद) वीज कंपनीने केलेल्या निकृष्ट दर्जाच्या कामाबाबत**

**(२) * ४८७२८ श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **उपमुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सकनेवाडी शिवारात (ता.जि.उस्मानाबाद) वीज कंपनीने केलेल्या निकृष्ट दर्जाच्या कामांमुळे बऱ्याच ठिकाणी विजेचे खांब जमीनदोस्त होऊन विद्युत स्पर्श झाल्याने अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली असल्याचे दिनांक ११ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा नियोजन समिती, आकांक्षित जिल्हा व नाबार्डसह विविध योजनेंतर्गत सकनेवाडी, सारोळा, मेडसिंगा आणि चिखली आदी गावांसह अन्य परिसरात करण्यात आलेली व सुरु असलेली पोल उभारणी व विद्युत तारा जोडणीची कोट्यवधी रुपयांची कामे निकृष्ट दर्जाची होत असल्याने स्थानिकांना मोठ्या प्रमाणात अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर कामांची तात्काळ दुरुस्ती करण्याबाबत तसेच संबंधित कंत्राटदार व अकार्यक्षम अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

मौजे सकनेवाडी (ता.जि.उस्मानाबाद) येथै श्री. रेवाप्पा कुदळे यांच्या शिवारात उच्चदाब वितरण प्रणाली योजनेअंतर्गत ११ केव्ही वीज वाहिनी व १० केव्हीए रोहित्र उभारणीचे काम प्रगती पथावर असलेल्या ठिकाणी दिनांक १०.०६.२०२२ रोजी झालेल्या वादळी वाऱ्यामुळे उच्चदाब वाहिनीच्या विद्युत खांबाला असलेला स्टे (तणाव तार) तुटुन सदर वाहिनीचे २ पोल जमिनीवर पडले. सदरचे काम महावितरणच्या देखरेखीखाली प्रगतीपथावर असल्यामुळे व ऊर्जान्वित केले नसल्यामुळे अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली नाही.

(२) व (३) होय, हे अंशत: खरे आहे.

मौजे सकनेवाडी (ता.जि.उस्मानाबाद) येथील सदोष वीज मांडणी संदर्भात कंत्राटदारास नोटीस देऊन वादळीवाऱ्यामुळे स्टे तुटून पडलेल्या उच्चदाब वाहिन्याच्या पोलची पुर्न:उभारणीची कार्यवाही त्वरीत करण्यात आली. तसेच मौजे सारोळा, मेंडसिंगा, चिखली या गावांत जिल्हा वार्षिक योजना इतर योजनेअंतर्गत करण्यात आलेली व सुरु असलेली कामे विविध नियमातील तरतुदीनुसार योग्य दर्जाचे करण्याबाबत महावितरण कंपनीस सूचना करण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील आदिवासी जिल्ह्यांतील बालक आणि माता यांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी नवसंजीवनी योजना सुरु करण्याबाबत

**(३) * ४४७८५ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी जिल्ह्यातील बालक आणि माता यांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी सुरू झालेल्या नवसंजीवनी योजना प्रलंबित असल्याची बाब माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत ५ वर्षाच्या कालावधीमध्ये १६ आदिवासी जिल्ह्यांमध्ये कुपोषणामुळे ८ हजार ८४२ बालकांचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आदिवासी जिल्ह्यांतील कुपोषण रोखण्याच्या दृष्टीने नवसंजीवनी योजना सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) हे खरे नाही,

(२) हे खरे नाही, १६ आदिवासी उपयोजना क्षेत्रातील जिल्ह्यांमध्ये झालेले बालमृत्यू हे Prematurity & Low Birth weight, Sepsis, Respiratory distress, Congenital anomaly, Birth Aspasia, Pneumonia इत्यादी वैद्यकीय कारणामुळे झालेले आहेत.

(३) राज्यातील १६ आदिवासी उपयोजना क्षेत्रातील जिल्ह्यांमध्ये नवसंजीवनी योजना अविरतपणे सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लातूर जिल्हयातील शेतीपंपाना अखंडीत वीज पुरवठा करण्याबाबत

**(४) * ४५८६४ श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), ॲड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **उपमुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यातील महावितरण विभागामार्फत जळालेले शेतीपंप तसेच गावातील सिंगल फेज रोहित्र दुरुस्तीस अनेक महिन्यांचा कालावधी लागत असल्याने शेतकऱ्यांचा वीज पुरवठा सदरहू कालावधीत खंडित रहात असल्याचे तसेच रोहित्र दुरुस्तीसाठी आवश्यक ऑईल उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी (औसा) यांनी दिनांक १३ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास लातूर जिल्हा नियोजन समितीच्या आढावा बैठकीत केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आणि उक्त प्रकरणी वीज नियामक आयोगाच्या तरतुदीनुसार कालमर्यादेत वीज पुरवठा सुरू करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेने (पुणे) सुरु केलेल्या विशेष अनुदान योजनेबाबत

**(५) * ४५३८० ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), डॉ.संदीप धुर्वे (अर्णी), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेने (बार्टी) (पुणे) दहावीत ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण प्राप्त केलेल्या अनुसूचित जाती आणि आर्थिक दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांसाठी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर विशेष अनुदान योजना सुरु केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त योजनेअंतर्गत प्रत्येक विद्यार्थ्याला व्यावसायिक तसेच उच्च शिक्षणाच्या पूर्व तयारीसाठी दोन लाख रुपयांचे आर्थिक सहाय्य मिळण्यासाठी राज्यातील जवळपास ४०,००० विद्यार्थ्यांनी अर्ज केले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बार्टी संस्थेमार्फत पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांची यादी अद्याप जाहीर केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तसेच विद्यार्थ्यांना अनुदानाचा लाभ तात्काळ मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे या स्वायत्त संस्थेच्या नियामक मंडळाच्या दि.२९.०६.२०२१ रोजीच्या ३० व्या बैठकीत दहावीत ९० टक्के पेक्षा अधिक गुण प्राप्त केलेल्या अनु. जाती व आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर विशेष अनुदान योजना शासनाच्या मान्यतेसाठी प्रस्तावित केली असून शासन स्तरावर सदर प्रस्तावाची छाननी करुन याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### राज्यात वीज कंपनीच्या व्यवस्थापनाने आरोग्य विमा मध्यस्थीसाठी निवड केलेल्या कंपनीची नियुक्ती रद्द करण्याबाबत

**(६) * ४८६७२ श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **उपमुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात महावितरण, महानिर्मिती आणि महापारेषण या तिन्ही कंपन्यामध्ये सुमारे ८० हजार नियमित अधिकारी, कर्मचारी कार्यरत असून सदरहू कर्मचाऱ्यांसह त्यांच्या कुटुंबियांना आरोग्याच्या दृष्टीने सुरक्षा कवच मिळावे म्हणून वीज कंपन्यांनी सन २०१५ पासून ओरिएंटल इन्शुरन्सच्या माध्यमातून आरोग्य विमा सुरु केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कंपनी व कर्मचारी यांच्यामध्ये चांगला दुवा असतानाही व्यवस्थापनाने मार्श इंडिया इन्शुरन्स ब्रोकर या कंपनीची मध्यस्थ म्हणून नियुक्ती केली असून सदरहू कंपनीची नियुक्ती केल्याने वीज विभागाचे कोट्यवधी रुपयांचे शुल्क केवळ मध्यस्थीसाठी खर्च होणार असल्याने सर्व कामगारांनी व अधिकाऱ्यांनी मार्श इंडिया इन्शुरन्स ब्रोकर कंपनीस विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मध्यस्थ म्हणून निवड केलेल्या मार्क इंडिया कंपनीची नियुक्ती रद्द करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सुत्रधारी कंपनी मर्या. यांनी दिलेल्या मान्यतेनुसार विमा नियामक विकास प्राधिकरण यांच्याकडे नोंदणीकृत मान्यताप्राप्त संस्थेमार्फत सन २०२२-२०२३ करीता मेडिक्लेम योजनेच्या सुसुत्रतेकरीता Consultant/ Intermediary/ Advisor/ Broker यांच्या विनामूल्य सेवा घेण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सुत्रधारी कंपनी मर्या. मार्फत ई-निविदा प्रसारित करण्यात येऊन सदर ई-निविदेच्या अटी व शर्तीनुसार Marsh India Insurance Broker यांची २०२२-२०२३ या कालावधीकरीता निवड करण्यात आलेली आहे. सदर सेवा ही निशुल्क असून या करीता Marsh India Insurance Broker या कंपनीस कोणतेही शुल्क अदा करण्यात आले नाही.
(३) लागू नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वीज यंत्रणेतील दोष अथवा बिघाड शोधण्यासाठी महावितरणाची अस्तित्वात असलेली 'स्काडा' प्रणाली अद्ययावत करण्याबाबत**

**(७) * ४६४८७ श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **उपमुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वीज यंत्रणेतील दोष अथवा बिघाड तसेच नेमक्या कोणत्या फिडरवर वीजपुरवठा खंडित झाला आहे याबाबत माहिती तात्काळ मिळण्यासाठी महावितरणची 'सुपरवायजरी कंट्रोल अँण्ड डेटा ॲक्वीझीशन सिस्टीम' अर्थात 'स्काडा' प्रणाली अस्तित्वात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भांडूप परिमंडळात असलेले स्काडा सेंटर अद्यापही पूर्ण क्षमतेने कार्यान्वित नसल्याचे दिनांक १२ एप्रिल २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, गत काही महिन्यांपासून कम्युनिकेशन लिंकची समस्या असल्याने वीज यंत्रणेतील बिघाड शोधण्याकरिता स्काडा प्रणाली अपयशी ठरून वारंवार खंडीत होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन स्काडा प्रणाली अद्ययावत करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे. स्काडा प्रणाली चालु करण्याकरीता कम्युनिकेशन लिंक हे महत्वाचे माध्यम आहे. भांडुप येथील स्काडा प्रणाली कंट्रोल सेंटरसाठी कम्युनिकेशन लिंक मे.आर.कॉम (R-com) रिलायंन्स कंपनी/ मे.बी.एस.एन.एल. (BSNL)/ मे.एम.टी.एन.एल. (MTNL) यांच्याकडून घेण्यात आलेली होती. त्यानुसार स्काडा

प्रणालीमधुन कम्युनिकेशन लिंक उपलब्ध करण्यात आली व साईट (field) वर समन्वय साधुन समांतर ऑपरेशन यशस्वीरित्या जानेवारी, २०२० पर्यंत करण्यात आले. परंतु मे.आर.कॉम कंपनी दिवाळखोरीत निघाल्यामुळे संबंधित कम्युनिकेशन लिंक अचानक २३.०१.२०२० पासून अकार्यान्वित झाली.

(३) हे खरे नाही. भांडुप परिमंडळाअंतर्गत वीज यंत्रणा बिघाड झाल्यास महावितरण अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून तातडीने कार्यवाही करुन वीज पुरवठा पुर्ववत सुरु करण्यात येतो.

(४) सदर स्काडा प्रणाली समाविष्ट उपकेंद्रातील कम्युनिकेशन लिंक चालु करण्याकरीता महावितरण मुख्य कार्यालयाकडून मे. बी.एस.एन.एल (BSNL) या कंपनीस LOA देण्यात आलेले आहे व कम्युनिकेशन लिंक पुन्हा कार्यान्वित करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोमनाथनगर (ता.त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक) येथील जिल्हापरिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या शिष्यवृत्तीमध्ये झालेला गैरव्यवहार

**(८) * ४८६१५ श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोमनाथनगर (ता.त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक) येथील जिल्हापरिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना आदिवासी विकास विभागाकडून सन २०१७ पासून सन २०२१ पर्यंत देण्यात आलेल्या शिष्यवृत्तीची रक्कम शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षकांनी विद्यार्थी व त्यांच्या पालकांच्या बँक खात्यात जमा न करता त्रयस्थ व्यक्तीच्या नावे जमा करुन गैरव्यवहार केल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई करुन आदिवासी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम अदा करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय. प्रस्तुत प्रकरणी संबंधित शिक्षण विस्तार अधिकारी यांचे मार्फत चौकशी करुन सोमनाथ नगर जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक तसेच शाळेचे सहशिक्षक यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचे दि. ०६.०६.२०२२ रोजीच्या आदेशान्वये जिल्हा परिषदेच्या सेवेतून निलंबित करण्यात आलेले आहे.

तसेच संबंधितांवर हरसूल पोलीस ठाणे, नाशिक ग्रामीण येथे भा.द.वि. कलम ४०६, ४०९, ४२० व ३४ अन्वये गुन्हा क्र.८७/२२, दि.०९.०७.२०२२ रोजी दाखल करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्ह्यातील पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती देण्याबाबत

**(९) * ४७७९० श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील समाज कल्याण विभागामार्फत इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंतच्या अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, विमुक्त जाती भटक्या जमाती, विमुक्त मागासवर्गीय प्रवर्ग तसेच इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत शिष्यवृत्ती देण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बुलढाणा जिल्हयात अर्ज करुनही सदरहू योजनेंतर्गत शिष्यवृत्ती देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुषंगाने उक्त प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**श्री संत शिरोमणी गोरोबा काका मातीकला बोर्डाचे कामकाज अद्याप सुरु न झाल्याबाबत**

**(१०) * ४६९५६ ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुंभार समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व व्यावसायीक विकासाच्या दृष्टीने तत्कालीन शासनाने श्री. संत शिरोमणी गोरोबा काका मातीकला बोर्डाची दिनांक ८ मार्च, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये स्थापना करुन १० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासन निर्णय निर्गमित करुन देखील बोर्डाच्या कामाची अद्यापही सुरुवात झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत :** (१), (२) व (३) राज्यातील कुंभार समाजाच्या उन्नतीसाठी व प्रगतीसाठी वर्धा येथे श्री.संत शिरोमणी गोरोबाकाका मातीकला बोर्डाची स्थापना करण्यास शासन निर्णय क्रमांक - केव्हीबी- २०१८/ प्र.क्र.७४/ उद्योग-६, दि. ८ मार्च, २०१९ अन्वये शासनाची मान्यता देण्यात आली आहे. सदर बोर्डाच्या कामकाजासाठी आर्थिक तरतूद करण्यासाठी वित्तीय लेखाशिर्ष उघडण्यासही शासनाची मान्यता देण्यात आलेली असून, सदर बोर्ड कार्यरत करण्यासाठी आवश्यक त्या प्रशासकीय व वित्तीय कार्यवाही शासनस्तरावर सुरू आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पेठ रोड (ता.जि. नाशिक) येथे आदिवासी मुलींच्या बहुमजली वसतीगृहाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे केल्याबाबत**

**(११) * ४६७२८ ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पेठ रोड (ता.जि.नाशिक) येथे आदिवासी विकास मंडळामार्फत १४.८५ कोटी रुपये खर्च करुन बांधण्यात आलेल्या आदिवासी मुलींच्या बहुमजली वसतीगृहाचे बांधकाम अतिशय निकृष्ट दर्जाचे असून संथ गतीने सुरु असल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू वसतीगृहाच्या निकृष्ट बांधकामाबाबत लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी आदिवासी विकास आयुक्त नाशिक व कार्यकारी अभियंता नाशिक (आदिवासी मंडळ) यांना दिनांक १३ फेब्रुवारी, २०२२, ०२ मार्च, २०२२ व २३ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास वेळोवेळी निवेदनाव्दारे कार्यवाहीची मागणी करूनही अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रस्तुत वसतिगृह इमारत बांधकामाची निविदा प्रक्रिया नव्याने राबविण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ०४ जून, २०२० रोजीच्या निवेदनाव्दारे मागणी केली त्यानुषंगाने दिनांक ०८ जून, २०२० रोजीच्या पत्रान्वये अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) मंडळ, नाशिक यांच्याकडून वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) मंडळ, नाशिक यांनी वस्तुस्थितीदर्शक अहवाल शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त अहवालाच्या अनुषंगाने शासनाने निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या संबधित कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) व (२) हे खरे नाही.

पेठ रोड (ता.जि.नाशिक) येथील आदिवासी मुलींच्या शासकीय वसतीगृह इमारतीचे बांधकाम अटी-शर्तीनुसार सुरु असून सद्यस्थितीत बांधकामावर रु.८.०० कोटी खर्च झालेला आहे. सदर बांधकामाची दक्षता व गुणनियंत्रक मंडळ प्रयोगशाळेतून गुणवत्ता तपासण्यात आलेली आहे. त्यानुसार बांधकामाचा दर्जा निकृष्ट आढळून आलेला नाही.

(३) व (४) हे खरे आहे.

(५) सदर वसतीगृहाच्या बांधकामाचा दर्जा निकृष्ट आढळला नसल्याने कारवाई करण्यात आलेली नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कळंब परिसरातील (जि.उस्मानाबाद) वीज पुरवठा सुरळीत करण्याबाबत**

**(१२) * ४५३९८ श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **उपमुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंब (जि.उस्मानाबाद) परिसरातील वीज पुरवठा सातत्याने खंडीत होत असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विजेअभावी शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होत असून जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सातत्याने वीज पुरवठा खंडित होत असल्याप्रकरणी नागरिकांनी अनेकदा आंदोलने केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, तसेच वीज पुरवठा सुरळीत होण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१) हे अंशत: खरे आहे. कळंब उपकेंद्रामधील येथील दोन पॉवर ट्रॉन्सफार्मर पैकी एक पॉवर ट्रान्सफॉर्मर नादुरुस्त झाल्यामुळे दुसऱ्या पॉवर ट्रान्सफॉर्मर वरील अतिरिक्त भार तसेच वादळ वारे व पाऊस यामुळे वीज पुरवठा खंडीत होण्याचे प्रमाण काहीसे वाढले होते.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

दि. २१ मे, २०२२ रोजी शेतकऱ्यांनी वीज पुरवठा खंडीत प्रकरणी स्वातंत्र्यवीर सावरकर पुतळा, कळंब येथे धरणे आंदोलन केले होते.

(४) ३३/११ के.व्ही. कळंब उपकेंद्रामध्ये ५ एमव्हीए क्षमतेचे दोन पॉवर ट्रान्सफॉर्मर आहेत. दि. २९.०४.२०२२ रोजी ५ एमव्हीए क्षमतेचा पॉवर ट्रान्सफॉर्मर क्र. २ नादुरुस्त झाल्याने पर्यायी व्यवस्था म्हणून नादुरुस्त पॉवर ट्रान्सफॉर्मर वरील काही भार हा शेजारील पॉवर ट्रान्सफॉर्मर क्र.१ वर जोडला. दरम्यानच्या काळात अतिरिक्त भार तसेच वादळवारे व पाऊस यामुळे वीजपुरवठा खंडीत होण्याचे प्रमाण वाढले होते. नादुरुस्त पॉवर ट्रान्सफॉर्मर दि. १०.०५.२०२२ रोजी बदलण्यात आले. परंतु सदर पॉवर ट्रान्सफॉर्मरची चाचणी असमाधानकारक असल्याने दि. २१.०५.२०२२ रोजी सायंकाळी दुसरा पॉवर ट्रान्सफॉर्मर बसवून वीजपुरवठा सुरळीत करण्यात आला.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात निवासी शाळांना कोरोना काळात दिलेल्या अनुदानाच्या निधीमध्ये झालेला गैरव्यवहार

**(१३) * ४८३८७ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धनगर समाजातील आर्थिकदृष्टया दुर्बल विद्यार्थ्यांना शिक्षण देणाऱ्या राज्यातील १४ नामांकित निवासी शाळा आणि विभागाच्या अधिकाऱ्यांनी संगनमताने कोरोना काळात शाळा बंद असतानाही अनुदानाच्या नावावर शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या निधीचा अपहार केला असल्याचे दिनांक १८ जून, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार संबंधित दोषी शाळा व्यवस्थापन आणि अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कळंब (जि.यवतमाळ) परिसरामध्ये कोठा, आष्टी व हिवरा परिसरात अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना भरपाई देण्याबाबत

**(१४) * ४८३२५ डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंब (जि.यवतमाळ) परिसरामध्ये कोठा, आष्टी, हिवरा परिसरात दिनांक २८ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास झालेल्या गारपीट व अवकाळी पावसामुळे शेतातील गहु, हरभरा, भाजीपाला व इतर पिकांच्या नुकसानीचे पंचनामे होऊन देखील नुकसानग्रस्तांना अद्यापही नुकसान भरपाई मिळाली नसल्याचे दिनांक १२ जुन, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील बोराळे येथील १३२ केव्ही विद्युत उपकेंद्राचे काम पुर्ण करण्याबाबत**

**(१५) * ४६२६९ श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **उपमुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील बोराळे येथील सन २०१५ मध्ये मान्यता मिळालेले १३२ केव्ही विद्युत उपकेंद्राचे काम २१ कोटी रुपये खर्च करुनही अद्यापपर्यंत अपुर्णावस्थेत असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरेआहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उपकेंद्रांचे काम तात्काळ पूर्ण करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) १३२/३३ के.व्ही. जव्हार उपकेंद्राचे काम पूर्ण करुन उपकेंद्र दि.३०.०९.२०१९ रोजी ३३ के.व्ही. स्तरावर कार्यान्वित केले आहे. तथापि, सदर उपकेंद्रास वीज पुरवठा करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या १३२ के.व्ही. स्त्रोत वाहिन्यांची (Source Lines) कामे पूर्ण न झाल्याने १३२ के.व्ही. जव्हार उपकेंद्र अद्याप १३२ के.व्ही. स्तरावर कार्यान्वित होणे बाकी आहे.

(२), (३) व (४) १३२ के.व्ही. जव्हार कार्यान्वित करण्यासंदर्भात शासन अंगीकृत महापारेषण कंपनीतर्फे खालीलप्रमाणे कार्यवाही सुरु आहे.

जव्हार उपकेंद्र १३२ के.व्ही. स्तरावर कार्यान्वित होण्यासाठी खालील वीज वाहिन्या कार्यान्वित होणे आवश्यक आहे.

१) १३२ के.व्ही. डहाणू ते सूर्यनगर - कवडास वाहिनी

२) १३२ के.व्ही. कवडास ते १३२ के.व्ही. जव्हार उपकेंद्र वाहिनी .

वरीलपैकी १३२ के.व्ही. डहाणू ते सूर्यनगर - कवडास वाहिनीचे काम प्रगतीपथावर आहे.

तसेच, १३२ के.व्ही. कवडास - १३२ के.व्ही. जव्हार उपकेंद्र वाहिनी उभारणीसाठी नुकतेच म्हणजे दि.२८.०६.२०२२ रोजी कार्यादेश देण्यात आले आहेत. या दोन्ही वाहिन्यांची कामे मे -२०२४ पर्यत पूर्ण करण्यास महापारेषण कंपनी प्रयत्नशील आहे. वाहिन्या कार्यान्वित झाल्यावर १३२ के.व्ही. जव्हार उपकेंद्र १३२ के. व्ही. स्तरावर कार्यान्वित करण्याचे नियोजित आहे.

-----------------

**अमरावती जिल्ह्यातील छत्रपती शिवाजी महाराज कर्जमाफी योजनेस**
**पात्र असलेल्या शेतक-यांना कर्जमाफी देण्याबाबत**

**(१६) * ४६५६१ श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या छत्रपती शिवाजी महाराज कर्जमाफी योजनेमध्ये अमरावती जिल्ह्यातील सन २०१२ पासून मंजूर असलेल्या शेतक-यांच्या यादीत नाव समाविष्ट असूनही शेतकऱ्यांना अद्यापपर्यंत कर्जमाफी मिळाली नसल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाकडून एसएमएसद्वारे सूचना येऊनही कर्जमाफीस पात्र लाभार्थी उक्त योजनेपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे शेतक-यांना नवीन कर्ज देण्यास बँकांकडून नकार देण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कर्जमाफी योजनेमध्ये सन २०१२ पासून मंजूर शेतक-यांच्या यादीतील शेतक-यांना कर्जमाफी देण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अतुल सावे :** (१), (२) व (३) अंशतः खरे आहे.
(४) याप्रकरणी वित्तीय तरतूद करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळाला देण्यात आलेल्या निधीमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(१७) * ४४५४८ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय मागासवर्ग वित्तीय विकास महामंडळाकडून (एनएसएफडीसी) विविध योजनांसाठी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाला देण्यात आलेल्या निधीत सुमारे २१ कोटी ४० लाख रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याची बाब माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हमी शुल्काचा भरणा न केल्याने, कर्जदारांनी कर्जाची परतफेड न केल्याने तसेच व्यवस्थापनातील गैरप्रकारामुळे एनएसएफडीसी ने सन २०१५ पासून आजतागायत महामंडळाला निधी दिलेला नसून सुमारे ८७ कोटी ३५ लाख रुपयांचा प्रस्ताव पाच वर्षांपासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महामंडळाने शासनाकडे सादर केलेल्या अहवालात सदर गैरप्रकार सन २०१२-१३ ते २०१४-१५ या कालावधीत झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत दोषी आढळुन आलेल्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

सन १९९३-९४ पासून राष्ट्रीय मागासवर्ग वित्त विकास महामंडळाची अधिकृत वाहीनी (NSFDC, Delhi) म्हणून महामंडळास मान्यता देण्यात आलेली आहे. या महामंडळामार्फत एनएसएफडीसीच्या विविध योजना राबविण्यात येतात.

सन १९९३-९४ ते २०१४-१५ या वर्षाअखेर महामंडळास एनएसएफडीसी योजनेअंतर्गत रू. १५३.९० कोटी मंजूर करण्यात आले असून प्रत्यक्षात रू. १४५.१६ कोटी महामंडळास प्राप्त झाले आहेत. त्याअंतर्गत आजअखेर विविध योजनेअंतर्गत रू १३७.६० कोटी लाभार्थींना वितरीत करण्यात आलेले आहेत.

सन २०१८-१९ मध्ये एनएसएफडीसी, दिल्ली यांचेकडून प्राप्त अहवालामध्ये खर्ची न केलेल्या (unutilized amount) रक्कम रू. २१.४० कोटी निधी दर्शविण्यात आला होता. सदर रक्कमेपैकी रक्कम रू. ५.५२ कोटी अखर्चीत निधी RTGS द्वारे दिनांक ०५-०१-२०१९ रोजी एनएसएफडीसीकडे परत करण्यात आला आहे. उर्वरित अखर्चीत निधी सन २०१२-१३ ते २०१४-१५ या कालावधीत महामंडळामध्ये झालेल्या अनियमितते मध्ये महामंडळाने एनएसएफडीसी योजनेच्या अखर्चित निधीपैकी रू. १४.१६ कोटी, महामंडळाच्या इतर बँक खात्यामध्ये नियमबाहयपणे वर्ग करून खर्च करण्यात आला सदर गैरव्यवहार / अनियमिततेची चौकशी राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांचेकडून सुरू असून सदर बाब न्यायप्रविष्ठ आहे.

एनएसएफडीसी महामंडळाची थकबाकी रू. ९३.२४ कोटी च्या वसुलीसाठी एनएसएफडीसी महामंडळाने लवादाची नेमणूक केली होती. लवादामार्फत वेळोवेळी एकूण ३८ सुनावण्या झाल्या असून लवादाच्या आदेशाप्रमाणे

महामंडळाने रू. ५.०० कोटी महामंडळाच्या व्याज खात्यातून थकित वसुलीपोटी एनएसएफडीसीकडे भरणा केली आहे. तसेच शासनाने एनएसएफडीसीची उर्वरित थकित वसुली रू. ८८.२४ कोटी RTGS द्वारे वर्ग करण्यात आलेली आहे. त्यामुळे आज रोजी एनएसएफडीसी, नवी दिल्ली यांची साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाकडे कोणतीही रक्कम थकित नाही.

(२) हे खरे आहे.

महामंडळामार्फत सन २०१५-१६ मध्ये विविध व्यवसायांचे रू. ८७.३५ कोटीचे प्रस्ताव मंजूरीकरिता एनएसएफडीसी यांचेकडे पाठविण्यात आले होते. त्यामध्ये एनएसफडीसी, दिल्ली यांचेकडील रू. ६१.६८ कोटी मुदत कर्जाचा समावेश होता. सदर प्रस्तावांच्या अनुषंगाने एनएसएफडीसी, दिल्ली मार्फत सन २०१६-१७ मध्ये रु. १८.९० कोटी विविध व्यवसायातंर्गत मंजूरही देण्यात आली होती. तथापि, महामंडळाकडे थकित वसुली रक्कम प्रलंबित असल्याने सन २०१५ पासून एनएसएफडीसीमार्फत महामंडळास निधी मंजूर करून वितरीत केलेला नाही.

(३) हे खरे आहे.

मा. विधानसभा सदस्य डॉ. सुधाकर भालेराव यांनी विधानसभा नियम क्र. १०५ नुसार साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळातील झालेल्या अनियमितता / गैरव्यवहाराबाबत विचारलेली लक्षवेधी सूचना, दिनांक २२-१२-२०१४ रोजी चर्चेसाठी आली असता, मा. मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई -३२, यांनी महामंडळातील अनियमितता/ गैरव्यवहाराची चौकशी राज्य गुन्हे अन्वेषण विभागामार्फत करण्याचे आश्वासन दिले. त्यानुसार प्रकरणी राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई कडून दहिसर पोलीस ठाणे भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा सन १९८८ अन्वये गुन्ह्या दाखल झाला असून सदर गुन्हयाचा तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांचेकडून करण्यात येत आहे. सदर बाब न्याय प्रविष्ठ आहे.

(४) राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांनी यांनी या गैरव्यवहारास / अनियमिततेस जबाबदार असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांची चौकशी / तपास करून त्यांच्यावर कायदेशिर कारवाई करण्यात आली असून सदर बाब न्याय प्रविष्ठ आहे.

(५) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## चिखली (जि.बुलढाणा) शहरातील निवासी इमारतीवरून गेलेल्या धोकादायक विद्युत वाहिन्यांबाबत

**(१८)* ४६७८७ श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **उपमुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली (जि.बुलढाणा) शहरामध्ये ११ के.व्ही.वाहिनीच्या संपर्कात आल्यामुळे गत ५ वर्षात २ जणांना अप्राणांतिक अपघात झालेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चिखली शहरातील निवासी इमारती वरून गेलेल्या ११ केव्हीच्या विद्युत वाहिन्या काढण्यात याव्यात अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३१ जानेवारी २०२० रोजी वा त्यासुमारास मंडळ कार्यालय, महावितरण, बुलढाणा यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तद्नुषंगाने उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन स्थानिक स्तरावरील अडथळे दूर करुन नवीन ११ के.व्ही. विदयुत वाहिनी उभारणीकरिता नगरपरिषद, चिखली यांचेद्वारा पर्यायी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत व ११ के.व्ही केळवद शहर वाहिनी हटविण्याचे काम सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१) हे खरे आहे. दि.०१.०६.२०१४ व दि.१०.०८.२०१६ रोजी ११ के.व्ही. वाहिनीच्या संपर्कात आल्यामुळे २ जणांना अप्राणांतीक अपघात झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) चिखली शहराला दोन ११ के.व्ही. वाहीन्यांद्वारे (११ के.व्ही. चिखली शहर व ११ के.व्ही. केळवद) वीज पुरवठा करण्यात येतो. त्यापैकी ११ के.व्ही. चिखली शहर वाहीनी ही गोरक्षणवाडी, इंदिरा नगर या सारख्या दाट लोकवस्तीतून जात असल्याने सुरक्षिततेच्या हेतुने नविन लिंक लाईनची उभारणी करुन गोरक्षणवाडी व इंदिरा नगर ह्या प्रभागातून स्थलांतरीत करण्यात आलेली आहे.
(४) लागू नाही.

-----------------

**भोर, वेल्हा व मुळशी (जि.पुणे) तालुक्यातील आदिवासी कोळी महादेव समाजाच्या जात पडताळणीच्या समस्यांबाबत**

**(१९) * ४७०७० श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोर, वेल्हा व मुळशी (जि.पुणे) तालुक्यातील आदिवासी कोळी महादेव समाजाच्या विद्यार्थी तसेच सर्वसामान्य व्यक्ती यांच्या जातीच्या दाखल्याची क्षेत्रबंधनामुळे जात पडताळणी होत नसल्याने त्यांचे शैक्षणिक व राजकीय नुकसान होत असून शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घेता येत नाही, हे खरे आहे काय
(२) असल्यास, आदिवासी गावांचा आदिवासी निरीक्षक, घोडेगांव, (जि. पुणे) व संबंधित महसूल विभाग यांच्यामार्फत दिनांक ०२ सप्टेंबर, २०१२ ते ०७ सप्टेंबर, २०१२ या कालावधीमध्ये सर्वेक्षण झालेले असतानाही आदिवासी लोकसंख्या असलेली गांवे व वाडया-वस्त्या आदिवासी क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन येथील आदिवासी समाजाचे हित लक्षात घेता आदिवासी समाजाच्या जातपडताळणीची समस्या निकाली काढण्यासाठी तसेच आदिवासी बहूल गावांना आदिवासी गांवे म्हणून घोषित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) भोर, वेल्हा व मुळशी (जि. पुणे) तालुक्यातील आदिवासी कोळी महादेव समाजाच्या विद्यार्थी, सर्वसामान्य व्यक्ती यांच्या अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्रांची पडताळणी अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, पुणे यांचेकडून वेळोवेळी केली जाते. राज्याच्या अनुसूचित क्षेत्राच्या पुनर्रचनेचा प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्यामार्फत सुरु आहे. तसेच आदिवासी बहुल गावांचे हित लक्षात घेता, अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रांतील महसूली गावातून नवीन स्वतंत्र महसूली गावांत रुपांतर झालेल्या गावांना आदिवासी उपयोजना क्षेत्राचे लाभ देण्याबाबत व अनुसूचित क्षेत्रांतील महसूली गावांतून नवीन स्वतंत्र महसूली गावांत रुपांतर झालेल्या गावांना पंचायतीसबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तार करणे) अधिनियम, १९९६ (पेसा कायदा) चे लाभ देण्याबाबत दिनांक ०९.०८.२०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बोईसर-चिल्हार (जि.पालघर) महामार्गालगत गटारांची केलेली कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत**

**(२०) * ४७८५६ श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोईसर-चिल्हार (जि.पालघर) महामार्गालगत केलेली कोट्यवधी रुपयांची गटारांची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महामार्गालगतच्या गटारांना ठिकठिकाणी तडे गेले असून काही ठिकाणी स्लॅब कोसळून त्यातील स्टील बाहेर पडले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पावसाळ्यात या ठिकाणाहून रस्त्यावरील माती थेट गटारांमध्ये शिरते त्यामुळे गटारे तुंबण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर गटारांची तातडीने दुरुस्ती करण्याकरिता तसेच संबंधित दोषी कंत्राटदाराविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
रस्त्यालगतची गटारे पावसाळ्यापूर्वीच साफ करुन घेण्यात आलेली आहेत.
(४) व (५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## अंबड सातपूर व सिन्नर (जि.नाशिक) येथे औद्योगिक क्षेत्रामध्ये बनावट उद्योजक दाखवून भाविक ग्रुप नाशिक यांनी बेकायदेशीररीत्या भुखंड खरेदी केल्याबाबत

**(२१) * ४८८९७ श्री.राम सातपुते (माळशिरस) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यातील अंबड सातपूर व सिन्नर या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळांतर्गत औद्योगिक क्षेत्रांमध्ये बनावट उद्योजक दाखवून भाविक ग्रुप नाशिक या नावाने भूखंडांची बेकायदेशीररीत्या खरेदी करुन खाजगी उद्योजकांना विक्री करण्यात आल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रादेशिक अधिकारी, नाशिक तसेच महामंडळातील उप मुख्य कार्यकारी अधिकारी, नाशिक यांच्या दुर्लक्षामुळे महामंडळाचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी बेकायदेशीररित्या झालेल्या खरेदी विक्री प्रकरणांना तात्काळ स्थगिती देवून भूखंड महामंडळाकडे जमा करुन संबंधितांवर गुन्हा दाखल करुन उच्चस्तरीय चौकशी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत :** (१) व (२) हे खरे नाही.
दिनांक २०/०६/२०१९ रोजी मे. भाविक (बीएसएस ॲटोमोबाईल्स प्रा.लि.) यांना मा. Debts Recovery Tribunal (DRT) यांनी जाहीर लिलाव करून नाशिक (सातपूर) औद्योगिक क्षेत्रातील भूखंड क्र. ६७ चे विभाजन व हस्तांतरण महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या मान्यतेने करण्यात आले आहे. सदर कार्यवाही महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या धोरणानुसार करण्यात आली आहे. यामध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे आर्थिक नुकसान झालेले नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

**हिंगोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांना वीज जोडणी देण्याबाबत**

**(२२)* ४७३१६ श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **उपमुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यात पाच हजारा पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी रितसर अनामत रक्कम भरुन देखील महावितरणकडून हजारो शेतकऱ्यांना मागील दोन वर्षापासून वीज जोडणीसाठी प्रतिक्षा करावी लागत असल्याची बाब माहे मे २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन हिंगोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांना तात्काळ वीज जोडणी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हिंगोली जिल्हयामध्ये दिनांक ३१/०३/२०१८ पर्यंत पैसे भरुन प्रलंबित असलेल्या ४८०७ कृषीपंप अर्जदारांपैकी ४३९७ कृषीपंप अर्जदारांना उच्चदाब वितरण प्रणाली योजनेअंतर्गत कृषीपंप वीज जोडण्या दिल्या आहेत व उर्वरित अर्जदारांना कृषीपंप वीज जोडणी देण्याचे काम प्रगतीपथावर आहे. "कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२०" अंतर्गत दिनांक ०१.०४.२०१८ पासून पैसे भरुन वीज जोडणीकरीता प्रलंबित असलेल्या ७८२ अर्जदारांपैकी ५३० अर्जदारांच्या कृषी पंपांना वीज जोडण्या देण्यात आल्या असून उर्वरित अर्जदारांच्या कृषीपंपांना वीज जोडण्या देण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेने नेट सेट प्रशिक्षण देण्याऱ्या शिकवणी संस्थांसाठी काढलेल्या निविदेमध्ये झालेला गैरव्यवहार**

**(२३) * ४४८९४ श्री.सुनील राणे (बोरीवली), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), डॉ.संदीप धुर्वे (अर्णी), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इतर मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी राबविण्याबाबत आलेल्या महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेने (महाज्योती) नेट, सेट प्रशिक्षण देणाऱ्या संस्थासाठी दिनांक २ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निविदा काढली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निविदेमध्ये संस्था नोंदणी प्रशिक्षण आणि त्यासाठी देण्यात येणाऱ्या गुणदानामध्ये फक्त कंपनी, दुकान कायदा आणि भागीदारी संस्था यांनाच गुण देण्याची अट घातली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर संस्थांसाठी काढलेल्या निविदेचे तांत्रिक काम देण्यात आलेल्या व्यक्तीची स्वत:ची प्रशिक्षण संस्था असून त्याच संस्थेला नेट सेट प्रशिक्षणाचे काम दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अन्य पात्र संस्थांना सदर निविदेत डावलण्यात आले असून विशिष्ट संस्थेला सोयीच्या अटी व शर्ती टाकल्यामुळे उक्त प्रकरणी विविध संस्थांनी इतर मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास वर्ग मंत्री, अध्यक्ष, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ व व्यवस्थापकीय संचालक, महाज्योती यांच्याकडे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून सदर निविदेमध्ये योग्य दुरुस्ती करुन पुनर्निविदा काढण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही, महाज्योती मार्फत काढण्यात आलेल्या निविदेमध्ये प्रशिक्षण संस्था नोंदणी करीता देण्यात आलेले गुणदान सर्व प्रकारच्या संस्थाना देण्यात आलेले आहे. याबाबतचा स्पष्ट उल्लेख निविदेमधील तांत्रिक लिफाफा मध्ये करण्यात आला आहे.

(३) हे खरे नाही,

(४) होय, एक निवेदन प्राप्त झाले. त्याबाबत संबंधितास महाज्योतीमार्फत कळविण्यात आले आहे.

(५) महाज्योती संस्थेमार्फत तपासणी करण्यात आली असून, तक्रारीत काहीही तथ्य आढळून आले नाही असे महाज्योती संस्थेमार्फत कळविण्यात आले आहे.

(६) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात आदिवासी कुटुंब खावटी योजनेंतर्गत मिळणाऱ्या किराणा किट पासून वंचित असल्याबाबत

**(२४) * ४४६६४ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), डॉ.संदीप धुर्वे (अर्णी), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.रवि राणा (बडनेरा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ४० हजार आदिवासी कुटुंबांना देण्यात येणाऱ्या खावटी योजनेंतर्गत किराणा किट अद्यापपर्यंत मिळाला नसल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेकरिता मंजूर २२४ कोटींचा निधी महामंडळाकडे वर्ग केला असूनही आदिवासी कुटुंबांना खावटी किट अद्यापही मिळालेले नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार आदिवासी कुटुंबांना खावटी किराणा किट त्वरीत देण्याबाबत तसेच उक्त योजना राबविण्याकरिता जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) व (२) हे खरे नाही.

खावटी अनुदान योजनेतर्गत ११,०७,८७७ लक्ष लाभार्थी कुटुबांना रुपये २,०००/- (रुपये दोन हजार फक्त ) त्यांच्या बँक /पोस्ट खात्यावर जमा करण्यात आले आहेत. तसेच प्रकल्प अधिकारी व आदिवासी विकास महामंडळाच्या यंत्रणेमार्फत ११,००,०३७ लाभार्थ्यांना किट वाटप करण्यात आले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पेठ तालुक्यातील (जि.नाशिक) कहांडोळपाडा पैकी देवळाचापाडा येथे रस्त्यांची झालेली दुरवस्था

**(२५) * ४८६१७ श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेठ (जि.नाशिक) तालुक्यातील कहांडोळपाडा पैकी देवळाचापाडा येथे सातशे ते आठशे लोकसंख्या असलेल्या आदिवासी पाडयांची विकास कामे रस्त्याअभावी प्रलंबित असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने निधी मंजूर करुनही अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे रस्त्यांची कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार रस्ते कामांचा मंजूर निधी तात्काळ वितरीत करण्याबाबत तसेच रस्त्यांच्या कांमाकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१), (२) व (३) कहांडोळपाडा पैकी देवळाचापाडा ग्रामा १७१ या रस्त्याची लांबी १.५ कि.मी. असून त्यातील ७०० मीटर लांबी वन विभागाच्या हद्दीतून जाते. सद्या रस्त्याचा पृष्ठभाग हा मुरुमाचा असून यावरून वाहतूक होत आहे. या रस्त्यावर लेखाशीर्ष ३०५४ २७२२ अंतर्गत सुमारे ४०० मीटर व लेखाशीर्ष ३०५४ ०४०७ अंतर्गत सुमारे ३५० मीटर रस्त्याची कामे मंजूर आहेत. तथापि, सदर रस्ता वन विभागाच्या हद्दीतून जात असल्याने वन विभागाची परवानगी घेण्याची कार्यवाही सुरू आहे. वन विभागाची परवानगी प्राप्त होताच रस्त्यांची कामे हाती घेण्यात येतील.

ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा कार्यक्रमांतर्गत कॉंक्रीटीकरण, स्मशानभूमी इ. कामे पूर्ण करण्यात आली आहे. तसेच, कहांडोळपाडा येथे भूमीगत गटार बांधण्याचे काम चालू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे अटाळी (ता.खामगांव, जि.बुलढाणा) येथील अटाळी उपकेंद्रा अंतर्गत असणाऱ्या बोरी आडगाव गावठाण फिडरचे विभाजन करण्याबाबत

**(२६) * ४६९८२ ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **उपमुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे अटाळी (ता. खामगाव, जि.बुलढाणा) येथील ३३/११ के.व्ही. अटाळी उपकेंद्र अंतर्गत असणाऱ्या ११ के.व्ही. बोरी आडगाव गावठाण फीडर या एकाच फीडर वरून अटाळी, बोरी, आडगाव कंचनपूर, बोथकाजी, वाहाळा बु.,वाहाळा खु., शहापूर, उमरा अटाळी, पेडका, पातोंडा, विहिगाव व रामनगर अशा १४ गावांना वीजपुरवठा होतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आवार येथील खामगाव नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा फिल्टर प्लांट चा २४ तास ३ फेज वीज पुरवठा देखील याच फीडर वरून प्रस्तावित असून ४० ते ४५ किलोमीटर लांब असलेल्या उच्च दाब वीज वाहिनीवर कुठेही बिघाड झाल्यास संपूर्ण १४ गावांचा वीज पुरवठा खंडित होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू फीडरचे विभाजन करुन अटाळी उपकेंद्र येथे ११ के.व्ही. व बोरगाव आडगाव गावठाण येथे ११ के.व्ही.ची नविन उच्चदाब वाहिनी टाकण्याबाबतचा प्रस्ताव अधिक्षक अभियंता, बुलढाणा यांच्याकडे मंजुरीसाठी सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रस्ताव मंजुर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

सद्यस्थितीत पाणी पुरवठा योजनेसाठी आवार येथे असलेल्या फिल्टर प्लांटची नवीन वीज जोडणी ही तात्पुरती उपाययोजना म्हणून महावितरणच्या ३३/११ के.व्ही. कोलोरी उपकेंद्रातून निघणाऱ्या ११ के.व्ही. टेंभुर्णा सिंगल फेजिंग वाहिनीव्दारे देण्यात आलेली आहे.
(३) हे खरे नाही.

(४) ११ के.व्ही. बोरी आडगाव  गावठाण वाहिनीचे विभाजन करण्यासाठी लागणारी ११ के.व्ही. वाहिनी उभारणी कृषी पंप वीज जोडणी धोरण-२०२० नुसार महावितरणच्या जिल्हा कृषी आकस्मिक निधी अंतर्गत प्राप्त निधीमधुन तांत्रिक व्यवहार्यतेच्या अधीन राहून  करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खांबाळे (ता.भिवंडी, जि.ठाणे) परिसरातील शिरगाव येथील वीटभट्टी वरील आदिवासी मजूरांच्या झोपड्यांना लागलेली आग

**(२७) * ४७७१२ श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खांबाळे (ता.भिवंडी, जि.ठाणे) परिसरातील शिरगाव येथील वीटभट्टी वरील आदिवासी मजूरांच्या १७ झोपड्यांना आग लागून आर्थिक नुकसान झाल्याचे दिनांक १६ मे, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू ठिकाणी वीटभट्टी मालकांद्वारे मजुरांच्या सुरक्षेची कोणतीही काळजी घेण्यात येत नाही, हे ही खरे आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुसार नुकसानग्रस्त मजूरांना आर्थिक मदत देण्याबाबत तसेच दोषी वीटभट्टी मालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) खरे आहे.
(२) खरे आहे.
(३) सदर घटनेमुळे बाधित झालेल्या १८ कुटूंबांना स्वयंसेवी संस्थेमार्फत प्रत्येक कुटूंबनिहाय २५ किलो गहू, २५ किलो तांदूळ व ब्लॅकेट, चादर इत्यादीचे वाटप करण्यात आले आहे. तसेच बाधित कुटूंबाना मदत देण्याबाबतचा प्रस्ताव शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दि.१३.०५.२०१५ मधील निकष विचारात घेऊन प्रस्ताव सादर करण्याबाबत तहसिलदार, भिवंडी यांना जिल्हाधिकारी, ठाणे यांच्यामार्फत कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वसई (जि.पालघर) विभागातील महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी केलेला गैरव्यवहार

**(२८) * ४४७६६ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **उपमुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई (जि.पालघर) विभागातील महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी गार्डीयन ग्रुप, सुर्या ग्रुप व जयदीप ग्रुप या तीन उद्योगांना ६ कोटी २१ लाख रुपयांचा नियमबाह्य लाभ दिल्याची तक्रार केल्याचे माहे एप्रिल २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वसई विभागाचे तत्कालीन अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता (प्रशासन), वरिष्ठ व्यवस्थापक व प्रोग्रॅमर (आयटी) यांच्या संगनमताने सदर गैरव्यवहार केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू गैरव्यवहारा प्रकरणी दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१) हे खरे आहे.

सदर प्रकरणी दि.१०.०४.२०२२ रोजी ई-मेलव्दारे महावितरण कंपनीच्या वसई मंडळ कार्यालयास तक्रार प्राप्त झालेली आहे.

(२), (३) व (४) सदर प्रकरणी चौकशी करण्यात येत असून, गैरव्यवहार आढळल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल.

-----------------

**हिंगोली जिल्ह्यातील सहकारी संस्थांना भाडेतत्वावर दिलेल्या शासकीय जमिनीचा दि परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने परस्पर लिलाव केल्याबाबत**

**(२९) * ४७३८२ श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली सेनगाव येथील सहकारी जिनिंग प्रोसेसिंग कारखान्यासाठी भाडेतत्वावर दिलेल्या शासकीय जमिनीवरील संस्थेकडील थकबाकीपोटी दि परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत परस्पर लिलाव करुन जमिनीची विक्री केल्या प्रकरणी चौकशी करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी अतिरिक्त मुख्य सचिव, सहकार व अतिरिक्त मुख्य सचिव, महसूल यांना माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दि परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने शासकीय जमिनीचा परस्पर केलेला लिलाव रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) होय.

तथापि, याप्रकरणी दि परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकमार्फत हिंगोली जिल्ह्यातील ११ सहकारी जिनिंग प्रेस संस्थांना कर्ज वाटप केले असून त्यातील ११ ही संस्था थकबाकीत आहेत. त्यापैकी कळनमूरी तालुक्यातील एका जिनिंग प्रेस संस्थेचे, हिंगोली तालुक्यातील एका जिनिंग प्रेस संस्थेचे दोन युनिट तसेच औंढा तालुक्यातील एका संस्थेची मालमत्ता जप्त करुन बँकेमार्फत लिलावाद्वारे विक्री करण्यात आली आहे. सदर लिलाव करण्यात आलेल्या मालमत्ता संबंधीत संस्थेच्या मालकीच्या असल्याबाबत बँकेने कळविले आहे. तसेच हिंगोली सेनगाव येथील कर्जवितरण केलेल्या कोणत्याही कर्जदार संस्थेकडे शासकीय जमीन लिझवर नसलेबाबत बँकेने कळविले आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**शासकीय आदिवासी माध्यमिक आश्रम शाळा खुटल (ता.जि. पालघर) येथे आदिवासी विद्यार्थ्यांकरीता उच्च माध्यमिक वर्ग सुरु करण्याबाबत**

**(३०) * ४८६११ श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय आदिवासी माध्यमिक आश्रम शाळा खुटल (ता.जि.पालघर) येथे इयत्ता ११ वी व १२ वीचे वर्ग सुरु करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी आदिवासी विकास मंत्री यांना दिनांक १३ जून, २०२२ रोजी वा त्या सुमारास दिलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी उपरोक्त आश्रम शाळेमध्ये उच्च माध्यमिक वर्ग सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) शासकीय आदिवासी माध्यमिक आश्रमशाळा खुटल (ता.जि. पालघर) येथे इयत्ता ११ वी व १२ वीचे वर्ग सुरु करण्याबाबतच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांच्याकडून सुधारीत अहवाल मागविण्यात आलेला आहे. प्रस्तुत अहवाल आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांच्याकडून प्राप्त झाल्यावर नियमोचित कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.
(४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.